# वेदोक्त आणि लोकमान्य टिळक

डॉ. ए. बी. जाधव, राज्यशास्त्र विभाग, शहाजीराजे महाविद्यालय, खटाव जि. सातारा

---

**प्रस्तावना**

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनात घडून आलेले वेदोक्त प्रकरण हे केवळ त्यांच्या एकट्यापुरते नव्हते. तर या प्रकरणाने महाराष्ट्रात ब्राहमण-ब्राहमणेतर संघर्ष निर्माण झाला. हे प्रकरण शाहराजांसह बहुजनांच्या आर्थिक, सामाजिक, राजकिय जडणघडणीच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. वेदोक्तवादात आपल्या क्षत्रियवर्णाचा अभिमान बाळगून छत्रपती शाहूंनी वर्णव्यवस्थेचे दिलेले वेदोक्ताचे अधिकार पुन्हा मिळवण्यासाठी ब्राहमणांच्या धार्मिक मक्तेदारीला आव्हान देवून जातीभेद आणि वर्णभेद नष्ट करण्यासाठी लढा दिला. प्रकरणात टिळकांची प्रतिमा महाराष्ट्रातील सनातनवाद्यांचे पुढारी किंवा धर्मरक्षक अशी होती. हे प्रकरण चिघळण्यास लोकमान्य टिळक कारणीभूत होते का? टिळकांची भुमिका काय होती? प्रस्तुत लेखात वेदोक्ता संदर्भात टिळकांची भुमिका यासंदर्भात आढावा घेतला जाणार आहे.

**उद्देश**

१) वेदोक्त प्रकरण समजून घेणे.
२) वेदोक्त प्रकरणांमुळे निर्माण झालेल्या ब्राहमण व ब्राहमणेतर चळवळीचा आढावा घेणे.
३) वेदोक्त प्रकरणासंदर्भात लोकमान्य टिळकांची भुमिका समजावून घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ अन्वेषणपद्धतीचा आधार घेण्यात आला आहे. समग्र टिळकखंड, शाहूछत्रपती आणि लोकमान्य टिळकयांच्या संदर्भात संदर्भग्रंथ, मासिकेयाच्या माध्यामातुन माहितीचे संकलन करण्यात आले.

**वेदोक्त अर्थ्**

वेदोक्त प्रकरणाचे मूळ हिंदूच्या वर्गव्यवस्थेत पहावयास मिळते. हिंदूधर्मात आर्य व अनार्य अशा दोन गटात समाज विभागला गेला. यापैकी ब्राहमण स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानतात. उच्च समाजात वेदपठनाचा अधिकार केवळ आपणालाच आहे. असे ते मानतात. धार्मिक संस्कारात वेदातील मंत्राना अत्यंत महत्व आहे. म्हणून आर्यांचे सर्व धर्मसंस्कार वेदोक्त मंत्रपठनाने पूर्ण होतात. यालाच वेदोक्त पध्दती म्हणतात. 'हिंदूधर्मातील सोळा संस्कार व इतर धर्मकृत्ये वैदिक मंत्रांनी करण्याचा अधिकार म्हणजे वेदोक्त'[१]. वेद हे ईश्वरनिर्मित असल्यामुळे त्यातील मंत्रांच्या आधारे संस्कार करणे, ब्राहमण, क्षत्रिय आणि वैश्य यांना परवानगी होती. काळाच्या ओघात वैश्य आणि क्षत्रिय यांना उपनयनाचा अधिकार नसल्यामुळे त्यांचा वेदातील मंत्राचा आधारे संस्कार करता येत नाहीत असा धार्मिक प्रवाह त्याकाळी होता. याच कारणाने छत्रपती शिवाजी महाराज, प्रतापसिंह महाराज, सयाजीराव गायकवाड यांच्या राज्याभिषेकाच्यावेळी विरोध झाला.

पुराणोक्त म्हणजे ही मानवाने निर्माण केली असल्याने त्यातील मंत्रांच्या आधारे शुद्रांचे विधी करता येत होते. आधुनिक काळात धर्मशास्त्राप्रमाणे ब्राहमण व शुद्र हे दोनच वर्ण

राहील्याने शुद्राचे विधी पुरणोक्त पध्दतीने केले पाहीजेत. असे धर्मशास्त्र सांगत होते. या सर्व प्रकरणास छत्रपती शाहू महाराजांनी कणखरपणे विरोध केला.

**वर्णव्यवस्था**

ब्राह्मण्, क्षत्रिय, वैश्य यातिन्ही वर्गाना वेदाचा अधिकार होता परंतु अनार्यांना अर्थात शुद्रांना वेदोक्त पद्धतीने विधी करता येत नव्हता. अनार्य किंवा शुद्र हे आर्यापेक्षा हीन असल्यामुळे त्यांचा धार्मिक विधी पुराणातील मंत्रांचा मदतीने पार पाडले जात होते. पुराणे मानवनिर्मित असल्याने शुद्राचे विधी पुरणोक्त पध्दतीने करावे असा प्रघात होता.

**वेदोक्त प्रसंग**

इ .स. १८९९ मधील हा प्रसंग, शाहूंच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. महाराज दरवर्षी कार्तिक स्नानासाठी नित्यमियमाने पंचगंगा नदीवर जात. दरवर्षी प्रमाणे ते भल्यापहाटे कडाक्याच्या थंडीत कार्तिक स्नानासाठी पंचगंगेच्या घाटावर गेले होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर इतर मंडळीही होती. स्नानाच्या वेळी त्यानां नारायण भट्ट नावाचा पुरोहीतास बरोबर घेतले होते. महाराजांच्या स्नानाच्या वेळी हा पुरोहित वेदोक्तपध्दती ऐवजी पुराणोक्त पध्दतीप्रमाणे मंत्र म्हणत असल्याने तसेच तो स्नान न करताच आला असल्याचे महाराजांच्या लक्षात आले. त्यावर त्यांनी पुरोहिताला त्याबद्दल प्रश्न विचारताच त्याने उर्मटपणे उत्तर असे दिले की, आपण क्षत्रिय नसल्यामुळे वैदिकमंत्र म्हणण्याची गरज नाही. शुद्रांना पुराणोक्त पद्धतीने अनुग्रह करण्यासाठी स्नानाची गरज नाही. पुरोहिताचे हे उत्तर ऐकल्यावरही महाराजांनी शांतपणे आपण क्षत्रिय असल्याचे सांगितले. तरीही नारायण भट्टाने आपला हट्ट कायम ठेवला. तो महाराजांना म्हणाला की, जोपर्यंत सगळे ब्रह्मवृंद आपण क्षत्रिय आहात असे जाहिर करत नाहीत तोपर्यत मी तुमची किंमत शुद्रापेक्षा अधिक समजणार नाही. छत्रपती शाहूमहाराजांना पुरोहिताच्या या उत्तराने चीड आली. शाहू महाराजांच्या मनात असा विचार आला की, हा आपल्याशी असा वागत असेल तर अन्य लोकांसाठी त्याचे वर्तन कसे असेल. या प्रसंगानंतर शाहू महाराजांनी राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला. महाराजांच्या या आज्ञेनंतरही राजोपाध्या याला तुम्ही आमच्या अपेक्षेप्रमाणे धार्मिक विधी करत नाही तेव्हा त्या कामाबद्दल दिले जाणारे उत्पन्न कमी केले जाईल. त्यावेळी राजोपाध्यायाने म्हटले की, उत्पन्न जप्त झाले तरी चालेल पण वेदोक्त कार्य करणार नाही. शेवटी महाराजांनी ६ मे १९०२ शेवटी राजोपाध्यायचे उत्पन्न जप्त करण्याचा आदेश काढला. इतर काही पुरोहितांची इनामे जप्त केली.

**लोकमान्य टिळकांची भुमिका**

ऑक्टोबर १९०१ मध्ये लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरीत 'वेदोक्ताचे खूळ' या नावाने लेख लिहीले. त्यामध्ये म्हटले की, 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत वेदोक्ताचा जो अधिकार दिला तो त्यांच्या कर्तृत्वाकडे पाहून दिली गेलेली सवलत होय. सध्या ही मागणी करणारे शिवाजी महाराजांपेक्षा थोर नाहीत. शिवाय परंपरेने चालत आलेली गृहकर्मे करण्याच्या पद्धतीने आपला मानभंग होतो तसेच सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. हे सिद्ध होते. असे मराठा समाजातील काही धुरीणांना वाटते. ही बाब दुर्दैवी आहे असे मत टिळकांनी नाव न घेता बडोदा आणि कोल्हापूर नरेशाकडे निर्देश करीत मांडले'[२]. छत्रपती शाहू महाराज हे राजे

आहेत. ते क्षत्रिय आहेत शिवाय ते शिवाजी महाराजांचे वंशज आहेत पण तरीही वेदोक्ताची मागणी करणे हे त्यांचे खूळ आहे असे टिळकांचे मत होते.

य. दि. फडके यांनी एक निरीक्षण असे नोंदवले की, 'राजकिय बाबतीत इंग्रज राज्यकर्त्यांना निर्भयपणे झेप घेऊन तुटून पडणारे लोकमान्य टिळक सामाजिक प्रश्नाबाबत बदल करण्याचे परंपरानिष्ठ धोरण स्वीकारीत असून आपल्या सनातनी अनुयायांच्या दडपणामुळे नमत असत'[३]. महाराष्ट्रातील नवब्राह्मण वर्गाचे टिळक हे प्रतिनिधी होते. त्यांनी कोल्हापूरला भेट देवून वेदोक्ताविषयी चर्चा केली. मुंबईच्या गव्हर्नरने विलायत सरकारला धाडलेल्या खलिफ्यात म्हटले, 'हे वेदोक्त प्रकरण खरोखरच काही न करता तसेच विरले असते, परंतु जेव्हा बाळ गंगाधर टिळक हे बाबा महाराजांच्या दत्तक विधानाच्या बाबतीत कोल्हापूरला आले होते तेव्हा त्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करुन वेदोक्ताच्या बाबतीत शाहू महाराजांच्या विरुद्ध असलेल्या ब्राह्मण चळवळ्यांना चिथावणी दिली आणि हे प्रकरण चिघळले. त्यामुळे जो प्रश्न सर्वसाधारण कोल्हापूरातच राहिला असता तो प्रश्न प्रतिष्ठेचा होऊन बसला'[४]. लोकमान्य टिळकांची जनमाणसातील प्रतिमा महाराष्ट्रातील सनातनवाद्यांचे धर्मरक्षक अशी झाली होती. त्यामुळे त्यांनी कोल्हापूरातील ब्रह्मवृंदाची बाजू घेतली.

लोकमान्य टिळक महाराष्ट्रातील नवब्राह्मणवर्गाचे प्रतिनिधी होते. 'वेदोक्त प्रकरणात आपल्या विरोधात भूमिका घेणाऱ्या सनातनी मंडळींना टिळकांचा पाठींबा होता. अशी छत्रपती शाहू महाराजांची खात्री होती. या विरोधकांपैकी अनेकांचे लोकमान्य टिळकांशी चांगले संबंध होते'[५]. सनातनी ब्राह्मण पुरोहितांना धर्मकृत वेदोक्त पद्धतीने करण्याची सक्ती केली त्यांचे इनामे जप्त केली. यावरील आक्षेप टिळकांनी स्पष्ट केला.

**समारोप**

धर्माचे जाती व्यवस्थेवरील प्राबल्य १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात देखील तेवढेच घट्ट असल्याचे या प्रकरणातून दिसून आले. वेदोक्त प्रकरणातून महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात पुरोगामीत्वाची चळवळ सुरु झाली. राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील पुरोगामीत्वाची चळवळ गतीमान केली. लोकमान्य टिळक यांच्यावादामुळे हा वाद प्रादेशिक पातळीवर सीमित न राहता राष्ट्रीय पातळीवर गेला. आधुनिक महाराष्ट्रातील एकूण जडणघडणीमध्ये वेदोक्त प्रकरण खूपच महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

१. पवार जयसिंग, २०१७, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पृ. ३७.
२. समग्र टिळक, खंड - ५, समाज संस्कृती, १९७६, केसरी प्रकाशन पुणे, पृ. १५० - १५७.
३. फडके य. दि. १९८६, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. पृ. ४१.
४. उपरोक्त, पवार. पृ. ४१
५. उपरोक्त, फडके. पृ. ३९.